**रे.के. नं. ६७ /२०२०**

**नि. क्र. ४८**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०७ यांचा जबाब शथपेवर सुरु.</u>**

**नाव** – दिया दिपक नटे, पुर्वाश्रमीची संजना शांताराम कोटकर,

**वय**– २५ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,

**सध्या राहणार** – साडवली, सह्याद्रीनगर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>सरतपास – अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. व्ही. गुरुपातगोळ यांच्याकडून</u> –**

०१. सन २०२० साली मी अविवाहीत होते आणि मोर्डे येथे रहायचे. लग्नापुर्वी माझ्या घरी वडील शांताराम कोटकर, आई अनिता कोटकर, भाऊ संदेश असे एकत्र रहायचो. माझे चुलते सिताराम धोंडु कोटकर आणि बबन कोटकर हे एकाच घरात वेगवेगळ्या भागात राहतात.

०२. दि. १९/०८/२०२० रोजी मी माझ्या घरी रात्री ०८.०० च्या सुमारास मोबाईल घेऊन अंगणात बसले होते. त्यावेळी माझे चुलत चुलते रविंद्र कोटकर दारु पिऊन मोठमोठ्याने ओरडत आमच्या अंगणाच्य बाहेर आले होते. ते मला म्हणाले की, तुझे मोठे पप्पा सिताराम कोटकर यांना सांग की मी त्यांना कापुन टाकणार आहे. ते हातामध्ये कोयती दाखवत मला बोलत होते.

०३. तेवढ्यात माझी आई माझा आवाज ऐकुन जेवण खोलीतून बाहेर आली. त्यावेळी आई त्यांना म्हणाली की, तुंम्ही हीला कशाला सांगता, ते (माझे चुलते) घरी आल्यानंतर त्यांनाच बोला. आई असे बोलल्यानंतर त्यांनी त्यांच्या हातातील कोयती रागाने माझ्या अंगावर उगारली. ते मारणार त्यावेळेसच मी माझ्या डाव्या हाताने ती कोयती पकडली. त्यावेळी माझ्या डाव्या हाताच्या मधल्या बोटाला लागून त्यातून रक्त

येऊ लागले. त्यावेळी माझी आई मला सोडवण्यासाठी पुढे आली. त्यावेळी त्याने ती कोयती माझ्या हातातून घेऊन आईच्या अंगावर ऊगारली. त्यावेळी कोयती आईच्या डाव्या खांद्याला लागली. आईला देखील लागून डाव्या खांद्याला रक्त येऊ लागले होते.

०४. आमच्या आरडा ओरडा ऐकुन माझे वडील मागच्या बाजूला होते ते तीथे आले. तसेच आजूबाजूचे लोक देखील आले. त्यांनी कोयती त्याच्या हातातून सोडवली आणि त्याला घरी जायला सांगीतले. तीथून निघताना देखील तो सगळ्यांना शिव्या देत, 'तुंम्हाला कापून टाकतो' अशी धमकी देत निघुन गेला.

०५. माझ्या वडीलांना मला आणि माझ्या आईला वाडीतील एका रिक्षाने गावचे पोलीस पाटील गणेश गुरव यांच्याकडे नेले. तेथून आम्ही साखरपा पोलीस स्टेशनला गेलो. तीथे तक्रार केल्यानंतर आम्हाला उपचारासाठी साखरपा सरकारी दवाखान्यात नेले. तीथे आमच्यावर ड्रेसींग झाले आणि पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे दाखल करण्यात आले. तीथून उपचार करुन पहाटे आम्ही घरी आलो.

०६. मला ती कोयती न्यायालयात दाखवल्यास मी ओळखु शकते. साक्षीदाराला आता जप्त मुद्देमाल कोयती दाखवली. ही तीच कोयती आहे. सदरची कोयती आर्टीकल अ येथे आहे. मी रविंद्र कोटकर याला पाहील्यास ओळखु शकते. तो आज न्यायालयात हजर नाही.

०७. या घटनेविषयी पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडुन –**

०८. हे म्हणणे खरे आहे की, यापुर्वी देखील या केससंदर्भात मी माझे आई किंवा वडीलांसोबत न्यायालयात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला याची

माहीती आहे की, या केसकामी माझे आई, वडील, चुलते यांचा पुरावा नोंदवलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, या केससंदर्भात काय साक्ष द्यायची याची माझ्या आई वडीलांशी चर्चा झालेली आहे.

०९. ऑगस्ट २०२० मध्ये मी घरीच होते. मी शिक्षण घेत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे पहाटे घरी आल्यानंतर दिवसभर मी घरीच होते. हे मला माहीती नाही की, त्यानंतर घरी असताना व्यक्तीशः साखरपा पोलीस चौकशी करता घरी आले होते अगर कसे. हे मला माहीती नाही की, दि. २०/०८/२०२० रोजी माझी आई झोपूनच होती किंवा कसे.

१०. आमच्या घरापासून पोलीस पाटलांचे घर एक किलोमीटर अंतरावर असेल. मला आमच्या घरापासून साखरपा दुरक्षेत्र अंदाजे कीती अंतरावर असेल मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनला मी सर्व माहीती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे माहीती दिल्यानंतर आम्ही दवाखान्यात गेलो होतो.

११. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या म्हणण्याप्रमाणे घराच्या आजूबाजूला राहणा–यांशी आमचे संबंध चांगले आहेत. आमचा वाडा घरापासून पाई चालत ५ मिनीटांच्या अंतरावर असेल. घर आणि वाड्याच्या दरम्याने घरे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, घराच्या अंगणात काही गोंधळ झाल्यास वाड्यापर्यंत ऐकु जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे वडील पाच मिनीटांनी तेथे आले. हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलते सिताराम आणि बबन कोटकर हे त्या दिवशी वाडीत गेले होते.

१२. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमाल कोयती सारखी कोयती कोणाच्याही अंगणात सहज उपलब्ध होऊ शकते. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनेच्या दुस–या दिवशी माझा साखरपा दुरक्षेत्रात जाण्याचा संबंध आलेला नाही. हे म्हणणे

खरे आहे की, एखाद्या कोयतीने आघात केल्यास त्या कोयतीच्या धारेमुळे सर्व बोटांना दुखापत होऊ शकते.

१३. हे मला माहीती नाही की, आरोपी आता मोर्डे गवळीवाडीमध्ये राहतो अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला माहेरी आल्यानंतर कधीही मोर्डे गवळीवाडीमध्ये पाहीलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कुटुंबियांचे असे म्हणणे आहे की, आरोपी मोर्डे गवळीवाडीमध्ये राहीला नाही पाहीजे. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझे वडील, आई यांचे आरोपीशी चांगले संबंध नाहीत.

१४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आमच्या घराच्या अंगणाच्या बाहेर येऊन दारुच्या नशेत मला, तुझ्या मोठ्या पप्पांना सांग की, मी त्यांना कापून टाकणार आहे, असे बोलत हातातील कोयती दाखवली हे मी खोटे नमुद करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने रागात कोयती माझ्या अंगावर उगारली व ती मी माझ्या डाव्या हाताने पकडली असता माझ्या डाव्या हाताच्या बोटाला दुखापती झाली हे मी खोटे नमुद करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने तीच कोयती माझ्या आईच्या खांद्यावर मारुन दुखापत केली हे मी खोटे नमुद करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला आहे व आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही**.

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.01.31 10:28:13 +0530

**(श्रीमती श्रुती ह. पाटील)**

**दिनांक ३०/०१/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**